# ECHO OF HIS CALL

## त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAANS

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXII | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, FEBRUARY 2020 | NO. 4


**पवित्र शास्त्र**

कृपया हा शास्त्रभाग पाठ करा

**प्रभुची स्तुती असो**

**स्तोत्र २०:१-९**

१) संकटाच्या दिवशी परमेश्वर तुझे ऐको, याकोबाच्या देवाचे नाम तुला उच्चपदी स्थापो.

२) पवित्र स्थानांतून तो तुला साहाय्य पाठवो, सीयोनांतून तो तुला आधार देवो.

३) तो तुझ्या सर्व अर्पणांचे स्मरण ठेवो, तुझा होम त्याला मान्य होवो.

४) तुझा मनोरथ तो पूर्ण करो, तुझे सर्व संकल्प सिध्दिस नेवो.

५) तू सिध्द केलेल्या तारणामुळे आम्ही जयोत्सव करु, आमच्या देवाच्या नामाचा ध्वज उभारू, तुझ्या सर्व मागण्या परमेश्वर पुऱ्या करो.

६) परमेश्वर आपल्या अभिषिक्ताला तारितो, हे मला आता कळून आले, तो आपल्या उजव्या हाताच्या उध्दारक प्रतापाची कृत्ये करुन आपल्या पवित्र स्वर्गांतून त्याचे ऐकेल.

७) कोणी रथांची व कोणी घोड्यांची प्रशंसा मिरवितात, आम्ही तर आमचा देव परमेश्वर याच्या नामाची प्रशंसा करु.

८) ते वाकून खाली पडले आहेत, आम्ही तर उठून ताठ उभे आहो.

९) हे परमेश्वरा, तारण कर. आम्ही धावा करितो, तेव्हा राजाने आमचे ऐकावे.

### FRAME YOUR FUTURE YOURSELF !

# तुमचे भविष्य तुम्ही स्वत: घडवा !

**"... आपला देव परमेश्वर याजवर प्रेम कर, त्याची वाणी ऐक व त्यास धरून राहा, कारण त्यातच तुझे जीवन आहे, त्यातच तुझी आयुर्वृध्दि आहे..."**

**(अनुवाद ३०:२०)**

**- पास्टर सॅम सेल्वा राज**

या जगातील लोक जीवन वाढ व व्याधिमुक्त दिर्घायुष्य लाभावे यासाठी उत्कंठीत असतात, आणि ते साध्य करण्यासाठी पुष्कळसे उपाय आणि परिश्रम करतात. याच्या पाठलागात काहींना विजय प्राप्त होतो, तर अनेकजण अयशस्वी ठरतात. अशी जुनी म्हण आहे की सर्वच सुशिक्षित साध्य करणारे नसतात, आणि सर्वच साध्य करणारे सुशिक्षित नसतात. या जगात काही साध्य/प्राप्त करावयाचे असल्यास, त्याला देवाची दया आणि कृपा मिळणे आवश्यक असते.

सर्वसामर्थी देवाने अनेक चांगल्या गोष्टी आणि आधुनिक यंत्रे/साधने केवळ त्याच्यावर भक्कम विश्वास असणाऱ्या त्याच्या लोकांच्या द्वारे दिली आहेत. आजकाल आपण विजेसारख्या अनेक गोष्टींचा वापर करीत असतो, वेगवेगळ्या प्रकारचे बल्ब , मोटारीवर चालणारी वाहाने, दुचाकी, विमाने, ट्रेन, ट्रॅक्टर, घड्याळे, कॅमेरे, शिलाई मशीन, औधषे इत्यादी. परंतु आपण जर या सर्व गोष्टींच्या संशोधकांच्या पार्श्वभूमि पाहिली, तर या सर्व संशोधनाची मागे आपला जिवंत देव आहे हे पाहून आपण आश्चर्यचकीत होऊ. त्यामुळे उत्पन्नकर्त्याला न ओळखणाऱ्या लोकांना या जगात फारच थोड्या गोष्टी तयार करता आल्या. परंतु आपण या देवाच्या लोकांनी लावलेल्या शोधाच्या फळांचा उपभोग घेत आहोत.

देव तुमच्याद्वारे या वर्षी काहीतरी नवीन करु इच्छितो. देवाची योजना आणि तिच्या अमलबजावणीचे लाभ हे सर्वांसाठी आहेत, जसे आपण सर्वजण वारा आणि पाऊस, सुर्य आणि चंद्र यांचा आनंद उपभोगतो. देव पक्षपात करीत नाही. (इफीस ६:९). देवाची योजना तुमच्या द्वारे प्रकट करण्याची भरपूर संधी आहे आणि तुम्हाला फार मोठ्या प्रमाणात

*(पान २ वर .....)*

१९६९ पासून शिक्षणाद्वारे जिवांना स्पर्श करणारे

# त्याच्या बोलाविण्याचा प्रतिध्वनी

मासिक प्रकाशन - इंग्रजी, तमीळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, मराठी, कन्नड, बंगाली, गुजराती, उरीया, नेपाली, आसामी, पंजाबी, उर्दु सिंहाला आणि अफ्रिकन



**"...... भूमीचा उपज यांची अभिवृध्दि करुन तुझे तो कल्याण करील".**
(अनुवाद २८:११).

प्रभु येशू ख्रिस्तामधील प्रिय मित्रांनो,

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अमुल्य नामामध्ये तुम्हा सर्वांना अभिवादन करितो ! देवाने त्याच्या शुभवर्तमानाच्या द्वारे विविध संस्कृतीतील लोकांच्या जीवनाला स्पर्श करण्यास त्याच्या सेवाकार्यावर आशीर्वाद पाठविला, त्याबद्दल त्याचे आभारी आहोत. हे मासिक वाचत आहात, त्याबद्दल, प्रार्थनाबद्दल आणि आम्हांला आधार देत आहात त्याबद्दल उपकृत आहोत.

तुम्हांला हे ठाऊक असेलच, की आम्ही आमच्या विविध सेवाकार्याच्या द्वारे प्रभु येशू ख्रिस्ताची गौरवी सुवार्ता १ डिसेंबर २०१९ ते ३१ जानेवारी २०२० या समयात सर्वत्र गाजविण्यात अंत्यत व्यस्त होतो. देव विश्वासू मालकाच्या नात्याने देशाबद्दलच्या त्याच्या दर्शनाच्या परिपूर्ततेकरिता आमच्या मुलभूत गरजा पुरवित आला आणि आमचे मार्गदर्शन करित आला आहे.

तुमच्या पत्रांद्वारे, संदेशांच्या ई-मेलच्या वॉटसअॅपच्या, दूरध्वनिच्या द्वारे आम्हाला उत्तेजन मिळत आहे. तुमच्या दयाळुपणा बद्दल देव तुम्हांला विपुल आशीर्वाद देवो. निरनिराळ्या माध्यमांच्या द्वारे आम्हाला अभिवादन केलेल्या आमच्या सर्व मित्रांचे आम्ही आभार मानीत आहोत.

**एको ऑफ हिज कॉलच्या** आमच्या जानेवारी २०२०च्या अंकात प्रार्थनेकरिता दिलेल्या मुद्यांच्या बद्दल देवाकडून आम्हाला चांगला प्रतिसाद मिळाला. आम्हाला आमच्या प्रार्थना भागिदाराबद्दल व आधार देणाऱ्या सर्वांबद्दल अभिमान वाटतो.

आमच्या सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन मधील विद्यार्थी प्रत्येक वर्षी शासनाद्वारे घेण्यात येत असलेल्या परिक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत आहेत. या वर्षी देखील एप्रिल २०२० मध्ये होणाऱ्या शालान्त परिक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता तुमच्या प्रार्थना अपेक्षित आहोत.

आमच्या मंडळ्यांकरिता, १६ भाषेतील प्रकाशनांकरिता, नहेम्या बायबल कॉलेज, शुभवर्तमान मुद्रणालय आणि इतर कार्यक्रमांकरिता प्रार्थना अपेक्षित आहोत. प्रभुमध्ये आम्ही तुमच्यावर प्रिती करित प्रार्थना अपेक्षित आहोत आणि तुमच्याकरिता प्रार्थना करित आहोत.

देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

ख्रिस्त येशूमध्ये तुमचा दास
**एस. सॅम सेल्वा राज.**





**CHIEF EDITORS**
Pastor S. Sam Selva Raj
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.
**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager
**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M. Phil., B.Ed.
**ADVISORY BOARD**
Adv. Jose Abraham
Adv. N. Balaji, B.Com., B.L.
Dr. S. Rabinder Boaz, M.S.
Er. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM)
Aud. K. Puratchivendan, M.Com., B.L.
Bro. Rajeswaran Samuel, B.Com.

**PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
**Echo of His Call Printers**
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
**Phone :** (+91-44) 2852 8282
2852 9293, 2854 7766
**Email :** sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
**Websites :**
www.echoofhiscall.org
www.echoofhiscall.com

*(पान १ वरुन .....)*

आशीर्वाद प्राप्त होतो. आपला देव "कंगालांस धुळीतून उठवितो, दरिद्रांस उकिरड्यावरून उचलून उभे करितो" (१ शमुवेल २:८). तुम्ही जीवनात सर्वकाही गमावले असेल, परंतु भविष्य गमावलेले नाही हे लक्षात घ्या ! प्रभु येशू ख्रिस्ताने तुमच्या करिता राखून ठेविलेले आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी

पन्नास वर्षांपूर्वी माझ्या जीवनात अशीच परिस्थिती आली होती. माझ्या मित्रांपैकी आणि नातेवाईकांपैकी काहीजण मद्य पिण्यास आणि अमली पदार्थ सेवन करण्याच्या व्यसनाधीन झालेले होते, सिनेमा पाहाण्यास जाणारे, शरिराच्या इच्छापूर्ती करण्यास बळी पडलेले, मुर्तिपुजक, लबाडी करणारे, दुसऱ्यांना त्रास देणारे, चोरी करण्यात

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners Village English High School Crusades 100 Prayer Warriors Community Development

गुंतलेले, पैशांचे अभिलाषी आणि देवाच्या वचनांचा त्याग केलेले असे होते. मी देखील त्या दुर्गुणातून मुक्त नव्हतो. परंतु प्रभु येशू ख्रिस्ताने मला त्याच्या कृपेने घोर पातकांतून वाचविले ! अशा परिस्थितीत मी निर्णय घेण्याशिवाय दुसरे काही करु शकत नव्हतो.

मी सारख्या बदलणाऱ्या मनस्थितीत असताना, माझा वर्गमित्र बंधु जी. जेयानाथ पौलमनी, याने मला एक हस्त पत्रिका दिली व मला ती वाचण्यास सांगितले. ती हस्तपत्रिका चेन्नाईत रहात असलेल्या बंधु सॅम्युएल डॅनियल यांनी प्रसिध्द केली होती. मी दोन मिनिटांत ती पत्रिका वाचून काढली. प्रत्रिकेवरील विषय होता, "येशू ख्रिस्त तुजवर प्रेम करितो." त्याने मला अगदी आकर्षित केले. मी ती हस्तपत्रिका परत परत वाचली !

येशू ख्रिस्ताने चांगले काय आहे आणि वाईट काय आहे हे आपल्याला शिकविले आहे हे मला कळले. त्यामुळे मी चांगल्याचा शोध घेऊ लागलो. प्रभुने माझा ताबा घेतला. "परमेश्वराने आपणासाठी भक्तिमान इसम निवडून काढिला आहे" (स्तोत्र ४:३). मी कोणतीही अट न ठेविता माझे संपूर्ण हृदय आणि भविष्य त्याला सोपवून दिले. माझे अंत:करण आनंदाने भरुन गेले.

"माझा वल्लभ गोरापान व लालबुंद आहे, तो लाखांत मोहरा आहे. त्याचे शिर बावनकशी सोन्यासारखे आहे, त्याची झुलपे कुरळ व डोमकावळ्यासारखी काळी कुळकुळीत आहेत. त्याचे डोळे ओढ्यांच्या काठांवरील होल्यांसारखे आहेत. ते दुधांत डुंबत असून नीट जडलेले आहेत. त्याचे गाल सुगंधोप्तादक वनस्पतीचे ताटवे आहेत. त्यांचे ओठ कमलांप्रमाणे असून त्यांतून गंधरस रंगवतो. त्याचे हो पुष्परागाने खचलेल्या सुवर्ण नलिकाच होत, त्याचे पोट नीलमणि जडलेल्या हस्तिदंतफळका सारखे आहे. त्याचे पाय सुवर्णाच्या कोंदणात बसविलेल्या संगमरवरी स्तंभांसारिखे आहेत, त्याचा बांधालवानोना सारखा आहे, तो गंधसरुसारखा उमदा आहे, त्याची वाणी परम मधुर आहे, तो सर्वस्वी मनोहर आहे, यरुशलेमाच्या कन्यांनो, माझा वल्लभ, माझा सखा असा आहे." (गीतरत्न ५:१०-१६).

मला येशूमध्ये एक पवित्र मित्र दिसला आणि वारस हक्काने त्याला माझा उध्दारक म्हणून स्विकारण्याचे ज्ञान प्राप्त झाले. या निवडीने माझ्या जीवनाची उलथापालट झाली !

मी बोलण्यात आणि आभ्यासात मंदगती असलेला असा होतो, राजकीय पाठबळ आणि आर्थिक आधार किंवा मनुष्यबळास वंचित होतो. तरी देखील प्रभु येशू ख्रिस्ताने मला वर उचलले. आता मला कोणत्याही गोष्टीचे उणे नाही तोच येशू तुम्हाला देखील वर उचलेल. त्याजकडे या !! जीवनात वाढ निश्चित आहे !!!

मानवजातीला प्रभुने दिलेला हा फार मोठा अधिकार आहे ! तुम्ही जर पुढे येऊन याची निवड केली, तर तो तुम्हाला जीवनात अधिकार राहिल !! या मार्गाने तुम्ही स्वर्गीय खजीना प्राप्त करुन घेऊ शकता !!! चांगली निवड म्हणजे देवाला आवडणारी गोष्ट निवडणे !

तुमचे पूर्वीचे/भूतकाळातील जीवन कदाचीत कडवट-दुखदायक असेल, परंतु भविष्याबद्दल तुम्ही अजिबात भिती बाळगू नये. भिऊ नका. एक चांगली बातमी तुमची वाट पहात आहे. तुम्ही स्वत: तुमचे भविष्य निवडू शकता कां ? तुम्हांला शांतिमय भविष्य हवे आहे कां ? तर ते तुमच्या हातात आहे. प्रभु अनेक प्रसंगी तुमच्याशी बोलला. आज समीर्पत भावनेने आज्ञापालन करण्याचा निर्णय घ्या. निर्णय तुम्हाला घ्यावयाचा आहे. तुम्हाला इतर कोणाच्या सहकार्याची गरज नाही, कारण ते काही समुद्रापलिकडे नाही, ते बर स्वर्गात नाही, की तुमच्या करिता कोणीतरी वर जाऊन ते आणावे. तुम्हाला करावयाचे आहे ते हे अंत:करणआने विश्वास ठेवावयाचा आहे आणि मुखाने कबूली द्यावयाची आहे. तुमचे भविष्य तुम्ही अंत:करणात तयार करणाऱ्या विश्वासावर आणि मुखाने देणाऱ्या कबूलवर अवलंबून आहे.

"जे हे धर्मशास्त्र मी तुला आज देत आहे ते तुला अगम्य नाही, तुज्यापासून दूर नाही ते स्वर्गात नाही की तू म्हणावे आम्ही ते पाळावे म्हणून आमच्यासाठी स्वर्गात चढून जाऊन कोण ते आमच्याकडे आणील आणि ते आम्हांस ऐकवील ?" ते समुद्रापलीकडे नाही की तू म्हणाले, आम्ही ते ऐकून पाळावे म्हणून आमच्यासाठी समुद्रापलीकडे जाऊन ते आमच्याकडे कोण आणील आणि आम्हांस ते ऐकवील ? हे वचन तर तुझ्या अगदी समीप, तुझ्या मुखी, तुझ्या चित्ती आहे, म्हणून तुला त्याप्रमाणे चालता येईल." (अनुवाद ३०:११-१४).

देवाने अनुवाद ३०:२० या वचनात जीवन आणि दिर्घायुष्य यांच्या बद्दलचे रहस्य नमुद केले आहे, "आपला देव परमेश्वर याजवर प्रेम कर, त्याची वाणी ऐक व त्यास धरून राहा, कारण त्यांतच तुझे जीवन आहे, त्यातच तुझी आयुर्वृध्दि आहे."

## १. तुझ्या देवावर प्रेम कर !

काही लोकांच्याद्वारे या जगाची प्रिती देहाची वासना, डोळ्यांची वासना, संसाराची फुशारकी अशा चुकीच्या जागांमध्ये गुंतवली आहे. "बापांनो, मी तुम्हांस लिहिले आहे, कारण जो प्रारंभापासून आहे त्याचे ज्ञान तुम्हांस झाले आहे. तरुणांनो, मी तुम्हांस लिहिले आहे, कारण तुम्ही सबळ आहा, तुम्हांमध्ये देवाचे वचन रहाते, आणि त्या दुष्टाला तुम्ही जिंकले आहे. जगावर व जगातल्या गोष्टींवर प्रिती करु नका. जर कोणी जगावर प्रिती करितो तर त्याच्या ठायी पित्याची प्रिती नाही. कारण जगात जे सर्व आहे ते म्हणजे देहाची वासना, डोळ्यांची वासना व संसाराची फुशारकी, हि पित्यापासून नाहीत, तर जगापासून आहेत आणि जग व त्याची वासना ही नाहीतशी होत आहेत, पण देवाच्या इच्छेप्रमाणे करणारा सर्वकाळ राहतो."

(१ योहान २:१–१७).

जगाच्या बातम्यांकडे पाहा. सर्वत्र खून, चोऱ्या, बलात्कार, आर्थिक गुन्हे घडत आहेत, ज्यांचा परिणाम सामान्य माणसांवर होत आहे, या सर्व गोष्टी घडत आहेत कारण लोकांनी त्यांची प्रीती चुकीच्या जागी पेरली आहे. लोक उत्पन्न कर्ता जो त्याचा विचार करीत नाही आणि अनेक त्यांचा विश्वास निर्माण केलेल्या गोष्टींवर खर्च करतात. बायबल, उपदेशक १२:२ या वचनात सांगत आहे, "आपल्या तारुण्याच्या दिवसात आपल्या निर्माणकर्त्याला स्मर." हल्ली राजकारणी पुढाऱ्यांच्याकरिता जीवन खर्च करणाऱ्यांच्या आणि खून व बलात्कार करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. ते त्यांच्या निर्माणकर्त्याला विसरले आहेत. प्रभुयेशू ख्रिस्ताने म्हटले "तर तुम्ही प्रथम त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवावयाची खटपट करा, म्हणजे याबरोबर तीही सर्व तुम्हांस मिळतील." (मत्तय ६:३३). फारच थोडके बोलावणे ऐकतात आणि कृति करीतात.

प्रथम म्हणजे, तुमच्या जीवनांतील सर्व कार्यात देवाला प्रथम स्थान देणे. असे करित असताना तुम्ही तुमच्या जीवनात अभ्दूते आणि चमत्कार पाहाल. मी तुम्हाला हे लिहित असताना, माझ्या जीवनात त्याचा अनुभव घेत आहे. मी तुमच्या समोर साक्ष देवू शकतो माझ्या सर्व संपत्ती, वेळ, शिक्षण, शांरिरीक स्वास्थ इत्यादी सर्वांमध्ये मी माझ्या प्रभुला प्राधान्य दिले आहे. यामुळेच देव माझा हजारोना आशीर्वाद देण्याकरिता एक साधन म्हणून वापर करीत आहे. तुम्ही देखील पुढे या ! देव तुमची असणारी कोणतीही गोष्ट तुमच्या पासून काढून घेणार नाही. देव तुमची आणि कार्याची भरभराट करील आणि तुमच्या पिढ्यांची देखील.

जे लोक त्याची प्रिती देहात, गोंधळाच्या आनंदात, प्रेम प्रकरणात खर्च करतात किंवा गुंतवतात त्यांनी देवावर प्रिती करावी आणि त्याचा परिणाम पाहावा. हे आवाहान आहे. प्रभु येशू ख्रिस्तासारखा जा जगात दुसरा कोणीही खरा प्रेमी आणि मित्र असू शकत नाही.

फार मोठ्या संख्येने लोक त्यांच्या डोळ्यांच्या पापामुळे आणि पैशांच्या मोहामुळे दु:ख सोशीत आहेत आणि त्यांतून ते बाहेर पडू शकले नाहीत. त्याचे पाप सिध्दिस नेण्यासाठी टी.व्ही., इंटरनेट आणि मोबाईल सारखे शोध त्यांच्या मदतीला येतात. काही लोक त्यांच्या आदर्शी (हिरो) च्या जीवनशैली आणि पैशांच्या द्वारे मोहविले जातात ते गुन्हे करतात आणि त्यांच्या तुरुंगात आणि असाध्य रोगामुळे हॉस्पीटलमध्ये होतो.

प्रियांनो, आज तुमची प्रिती कोठे खर्च करीत आहात ? योग्य ठिकाणी गुंतविली आहे का ? त्याचा शेवट लक्षात घेतला आहे का ? देव जर तुमच्या कार्याला शिक्षा करीत असेल तर त्या चिखलांतून बाहेर पडा आणि येशूच्या पवित्र मुखाकडे पहा.

तो दुर्गुण म्हणजे देहाची वासना ही धोकादायक आहे. देव गर्विष्ट त्याला विरोध करणारे असे समजतो. "देव गर्विष्टांचा विरोध करितो." (याकोब ४:६). काही जण ते जरी गरीब असले, तरी श्रीमंत असल्याची बढाई मारतात. परंतु त्यांची खरी परिस्थिती कोणाच्या तरी लक्षात आल्यावर त्यांच्याकडे तुच्छतेने पाहिले जाते. देव लिनांस

*(पान ६ वर .....)*


## एको ऑफ हिज कॉल

**(पत्रव्यवहारद्वारा अभ्यासक्रम)**

**बायबल कोर**

आम्ही पवित्र शास्त्रातील मुलभूत सत्यांवर आधारीत शास्त्राभ्यास देतो. अभ्यासक्रमासाठी **न्यु लाईफ फॉर यू** नावाचे पुस्तक तुम्हाला पुरविण्यात येईल. अभ्यास क्रम पूर्ण केल्यानंतर तुम्हाला एक प्रशस्तीपत्र देण्यात येईल. यासाठी कोणत्याही प्रकारची सक्तीची फी आकारली जात नाही.

**पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजी अभ्यासक्रम**

आता पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजी अभ्यासक्रम ॲडव्हान्स स्वरुपात पास्टर आणि ख्रिस्ती पुढारी सुध्दा या अभ्यासक्रमाचा लाभ घेऊ शकतात. कोर्सची फी १००० रु. आकारली जाईल. १४२ प्रकरणे असलेली ७ पुस्तके यात समाविष्ट आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येईल.

अधिक माहिती करिता कृपया लिहा :

The Chairman, Nehemiah Bible College, Echo of His Call,
10, Mohammed Abdullah 2nd Street, Opp. Cricket Stadium,
Chepauk, Chennai - 600 005. INDIA.
Tel.: (044) 2852 8282 / 2852 9293 / 28547766 Call : (+91)98410 71852
95661 31858 E-mail : biblecor@yahoo.co.in


The details of our Bank Accounts are given below. Please inform us the details of your remittances.

| Bank | Branch | Name | IFSC Code No. | Account Number |
|---|---|---|---|---|
| 1. STATE BANK OF INDIA | Triplicane, Chennai -5 | S. Sam Selva Raj | SBIN 0000249 | 102329 34679 |
| 2. ICICI BANK | Anna Salai, Chennai -2 | Echo of His Call | ICIC 0006038 | 6038 05022319 |

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार

# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**१९ फेब्रुवारी २०२० ते १८ मार्च २०२०**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## देव कार्यरत आहे !
### स्तुति करीता मुद्दे

**१९ फेब्रुवारी** : आमच्या वचनबध्द परिश्रमांबद्दल आणि ऐक्याबद्दल प्रभुची स्तुती करा.

**२० फेब्रुवारी** : **एको ऑफ हिज कॉलच्या** सेवाकार्याला आधार देणाऱ्या सर्वांकरिता देवाची स्तुति करु या.

**२१ फेब्रुवारी** : आमच्या सर्व यांत्रिकी काम करणाऱ्या स्टाफ आणि त्यांच्या कुटुंबाकरिता देवाची स्तुति करु या.

**२२ फेब्रुवारी** : आमच्या मुख्य मंडळीत दर रविवारी पांच भाषांमध्ये होत असलेल्या एकूण सात आराधना सभा देव आशीर्वादीत करीत आहेत.

**२३ फेब्रुवारी** : देवाने आमच्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांना आशीर्वादीत केले आहे.

**२४ फेब्रुवारी** : आमच्या **सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशनच्या** प्रिन्सिपल, शिक्षक आणि कर्मचारी वर्गाबद्दल देवाची स्तुति करु या.

**२५ फेब्रुवारी** : आमच्या मुद्रणालयात एकूण सोळा भाषांमध्ये छापून सर्व मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यात आलेले शुभवर्तमान साहित्य देवाने आशीर्वादीत केले.

**२६ फेब्रुवारी** : आमच्या दवाखान्याच्या सेवेत देव चमत्कार घडवित आहे.

**२७ फेब्रुवारी** : आमच्या सर्व प्रार्थनेतील विश्वासातील, आजीव आणि महान सेवा कार्यातील भागीदारांबद्दल देवाची स्तुति करु या.

**२८ फेब्रुवारी** : मागील वर्षी देवाच्या कृपेमुळे आम्ही शुभवर्तमान न पोहंचलेल्या ठिकाणांमध्ये ते घेऊन जाऊ शकलो.

**२९ फेब्रुवारी** : पुढील महिन्यात शासकिय शालान्त परिक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यां करिता प्रार्थना करा.

**०१ मार्च** : देवाने **एको ऑफ हिज कॉलचे** मागील महिन्यातील सर्व कार्यक्रम आशीर्वादीत केले.

**०२ मार्च** : आमच्या सर्व वाहनांचे आणि वाहान चालकांचे देव रक्षण करीत आहे.

**०३ मार्च** : देव आमची वरिष्ठ पाळक पास्टर सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण करीत आहेत.

## प्रार्थने करीता मुद्दे

**०४ मार्च** : देवाने **एको ऑफ हिज कॉलच्या** या महिन्यातील सर्व आर्थिक पुरवाव्यात यासाठी प्रार्थना करु या.

**०५ मार्च** : आमच्या बायबलकोर आणि थियॉलॉजीकल अभ्यासक्रम करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकरिता प्रार्थना करु या.

**०६ मार्च** : सर्व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या लोकांची व्यसनातून सुटका व्हावी.

**०७ मार्च** : आपल्या देशांतील तरुण-तरुणी देवाच्या जवळ यावेत यासाठी प्रार्थना करु या.

**०८ मार्च** : आपल्या मंडळ्यांतील सभासदांना देवाने मिशन क्षेत्रात सेवा करणाऱ्या सेवकांकरिता प्रार्थना करण्याचा आत्मा द्यावा.

**०९ मार्च** : आफ्रिकन सहसंपादिका बहिण मारियेटची नेलसन आणि तिच्या कुटुंबाकरिता प्रार्थना करु या.

**१० मार्च** : जागतिक शांततेकरिता प्रार्थना करु या.

**११ मार्च** : २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाकरिता देवाने **नहेम्या बायबल कॉलेज** करिता योग्य विद्यार्थी द्यावेत याकरिता प्रार्थना करा.

**१२ मार्च** : सर्व देशांमध्ये संजीवना करिता प्रार्थना करणारे प्रार्थनायोध्दे तयार व्हावेत यासाठी प्रार्थना करा.

**१३ मार्च** : आमच्या मुद्रणालया करिता देवाने फोल्डींग मशीन आणि पिनींन मशीन खरेदी करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा यासाठी प्रार्थना करु या.

**१४ मार्च** : आपल्या सर्व राजकीय नेत्यांना तारणाचा अनुभव यावा या करिता प्रार्थना करु या.

**१५ मार्च** : **एको ऑफ हिज कॉलच्या** कार्याच्या प्रगती करिता आणि विस्तारा करिता प्रार्थना करु या.

**१६ मार्च** : सर्व जगभरातील अविश्वासी आणि दहशदवादी लोकांमध्ये पश्चातापी अंत:करण तयार व्हावे यासाठी प्रार्थना करु या.

**१७ मार्च** : देवाने आमच्या कार्यालयासाठी आणि शाळेसाठी पुरेसा स्टाफ द्यावा यासाठी प्रार्थना करु या.

**१८ मार्च** : देवाने आमचे वरिष्ठ पाळक एस.सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांना या जगातील सर्व दुष्ट शक्तिपासून सुरक्षित ठेवणे सुरु ठेवावे यासाठी प्रार्थना करु या.

## महान सेवा कार्य भागीदारांची - कार्य केंद्रे

● **केरळ**-त्रिवेंद्रम, कोट्याम, थीरूवेल्ला, एर्नाकुलम ● **तामिळनाडू**-त्रिची, कोईम्बतूर, मदुराई, नागरकोईल, असारी पाल्लम, सेलम ● **पंजाब**-लुधीयाना ● **मध्यप्रदेश**-भोपाळ ● **जम्मू-काश्मीर**-उधामणूर ● **उत्तर प्रदेश**-लखनऊ ● **गुजराथ**-अहमदाबाद ● **बिहार**-झारखंड ● **पश्चिमबंगाल**-कोलकत्ता ● **नागालॅण्ड ओरिसा**-नयागड ● **आंध्रप्रदेश**-विशाखापट्टनम ● **महाराष्ट्र**-मुंबई ● **पॉण्डेचरी** ● **पाकिस्तान** ● **श्रीलंका** ● **बांगलादेश** ● **नेपाळ**

*(पान ४ वरून.....)*

कृपादान देतो. (याकोब ४:६) "जगावर व जगातल्या गोष्टीवर प्रिती करु नका. जर कोणी जगावर प्रिती करितो तर त्याच्या ठायी पित्याची प्रिती नाही." (१ योहान २:१५).

## २. येशू ख्रिस्ताची वाणी ऐका.

येशू ख्रिस्त लोकांना मनुष्यांच्या द्वारे, छापील लिखाण आणि साधनांद्वारे बोलवितो - पाचारण करितो. तो तुम्हाला देखील बोलावितो. तो तुम्हाला एक नवीन जीवन देवू इच्छितो. "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हांस विश्रांती देईन." (मत्तय ११:२८).

या जगात लोक स्वत:स देवाचे किंवा अवतारधारी देवाचे निरोपे म्हणविणाऱ्या लोकांकडून फसविले जात आहेत. परंतु येशूच्या मागे गेल्यामुळे - त्याला अनुसरल्यामुळे कोणीही गरीब झालेला नाही. इस्त्राएलांचा राजा दाविद असे जाहीर करितो, "मी तरुण होतो आणि आता म्हातारा झालो, तरी धार्मिक निशश्रति झालेला व त्याची संतती भिकेस लागलेली मी पाहिली नाही." (स्तोत्र ३७:२५)

"अहो दिव्यदूतहो, परमेश्वराला श्रेय द्या, परमेश्वराला गौरव व सामर्थ्य यांचे श्रेय द्या. परमेश्वराला त्याच्या वैभवी नामाचे श्रेय द्या, पावित्र्याने युक्त होऊन त्याची आराधना करा. परमेश्वराचा ध्वनि जलांमधून चढत आहे, तेजपूर्ण देव गर्जना करीत आहे, परमेश्वर जलाशयांवर आहे. परमेश्वराचा ध्वनि प्रबळ आहे, परमेश्वराचा ध्वनि प्रतापमय आहे. परमेश्वराचा ध्वनि देवदारु मोडितो, परमेश्वर लबानोनाच्या देवदारुंचा चक्काचूर करतो. तो त्यांस वारसांप्रमाणे उसळांवयास लावितो, लबानोन व शिर्योन यांस गव्याच्या बत्साप्रमाणे उसळावयास लावितो. परमेश्वराचा ध्वनि वने कंपायमान करितो, परमेश्वर कादेशचे वन कंपित करितो. परमेश्वराचा ध्वनि हरिणीस गर्भ गाळावयास लावितो आणि वनवृक्ष बोडके करितो. त्याच्या मंदिरात सर्वत्र महिमा ! महिमा ! असा ध्वनि दुमदुमतो. परमेश्वर जलप्रलयावर आरूढ होतो, परमेश्वर राजासनावर सर्वकाळ बसलेला आहे. परमेश्वर आपल्या लोकांस सामर्थ्य देईल, परमेश्वर आपल्या लोकांस शांतीचे वरदान देईल." (स्तोत्र २९:१-११)

प्रभु येशू ख्रिस्त तुम्हाला आग्रहाने बोलवित आहे. तो या नवीन वर्षात तुम्हांला नवीन जीवन देऊन तुम्हाला सुंदर असे पाहू इच्छितो. प्रभु येशू या संदेशाच्याद्वारे तुमच्या हृदयाचे दार ठोकीत आहे. कृपया दुर्लक्ष करुन पुढे जाऊ नका.

तुम्ही कदाचित अनेक वर्षांपासून ख्रिस्ती असाल ! प्रभुची सेवा करीत असाल !! भरपूर दान देत असाल !!! तरी देखील प्रभुला तुम्ही "पहिली प्रिती" गमावल्याची काळजी वाटते. (प्रकटी २:४).

काळाच्या ओघात कदाचीत त्याने/तिने प्रार्थनेची वेळ कमी केली असेल, जीवनात प्रभावी प्रार्थनेची आणि पवित्री करणाची उणीव किंवा कमतरता आली असेल. पैशाच्या आणि वैयक्तिक जीवनात विश्वासुपणात कमतरता आली असेल. तर तत्परतेने सर्व पूर्ववत करा. तुमच्या जीवनात मध्यस्थी करणारा येशू लवकरच अंतराळात येईल. "तुम्हाला स्वत: पूर्णपणे माहीत आहे की जसा रात्री चोर, तसा प्रभूचा दिवस येतो." (१ थेस्सल ५:२) वर घेतले जाण्याच्या नंतर पश्चाताप वाव नाही. प्रभु येशू पांढऱ्या राजासनावर बसणार आणि जगाचा न्याय करणार. त्याजकडे येणारे ते आशीर्वादीत.

## लवकरच घडणाऱ्या गोष्टी परिश्रमपूर्वक वाचा.

"नंतर मोठे पांढरे राजासन व त्यावर बसलेला एक जण माझ्या दृष्टीस पडला, त्याच्या तोंडापुढून पृथ्वी व आकाश ही पळाली, त्यांकरिता ठिकाण म्हणून सांपडले नाही. मग मृत झालेल्या लहानथोरांना मी राजासनापुढे उभे राहिलेले पाहिले. त्या वेळी पुस्तके उघडली गेली, तेव्हा दुसरे एक पुस्तक उघडले गेले, ते जीवनाचे होते, आणि त्या पुस्तकांत जे लिहिले होते त्यावरुन मृतांचा न्याय ज्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणे ठरविण्यात आला. तेव्हा जे मेलेले लोक समुद्रात होते त्यांस समुद्राने दिले, मरणावस्थेत व अधोलोकांत होते त्यांस त्यांनी दिले आणि ज्यांच्या त्यांच्या कर्माप्रमाणे प्रत्येकाचा न्याय ठरविण्यात आला. तेव्हा मरण व अधोलोक ही अग्नीच्या सरोवरांत टाकिली गेली, अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण आहे. ज्या कोणाचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही, तो अग्नीच्या सरोवरात टाकिला गेला." (प्रकटी २०:११-१५).

## आपण सुटका करणार नाही?

"हे इस्त्राएला, तू धन्य आहेस, परमेश्वराने उध्दरिलेल्या प्रजे, तुजसमान आहे ? तो तुझ्या साहाय्याची ढाल आहे, तुझ्या प्रतापाची तरवार आहे. ह्यामुळे तुझे शत्रु तुला शरण येतील, तू त्यांची उच्चस्थाने पादाक्रांत करिशील." (अनुवाद ३३:२९).

## ३. त्याला बिलगा, तो तुमचे जीवन आणि दीर्घायुष्य आहे.

प्रियांनो, माझे दीर्घायुष्य प्रभु येशू ख्रिस्ताला बिलगलेले, मधुर आणि फलदायी आहे. मी त्याची चव घेतल्या नंतर तुम्हाला सांगत आहे हि संधी तुम्ही जर गमावली, तर माझ्या गोष्टी गमावलेले आणि अपयशी लोकांच्या पहिल्या रांगेत उभे असाल. तुम्हाला येशूचा स्विकार न केल्याबद्दल आणि विजयी जीवन न जगल्या बद्दल खेद व्यक्त करावा लागेल. तेव्हा येशूकडे येण्याची हीच योग्य वेळ आहे ! तुम्हाला आशीर्वाद मिळेल !! तुमचे संपूर्ण जीवन प्रभु येशू ख्रिस्ताला स्वाधीन करा. तो तुम्हाला आशीर्वादीत असे दीर्घायुष्य देईल !

❖❖❖

COMFORT ONE ANOTHER !

# एकमेकांचे समाधान करा !

आपल्या समाजात फार मोठ्या प्रमाणात लोक त्यांचे सांत्वन/समाधान करावे अशी अपेक्षा करित असताना, आपणास हे निदर्शनास येते की त्याचे सांत्वन/समाधान करण्याऐवजी लोक त्यांना धिक्कारतात. एक गरीब मनुष्य श्रीमंत व्यक्तिकडे आर्थिक मदतीकरिता जातो, तेव्हा त्याला रागाने ओरडून घालवून दिले जाते. जेव्हा अशिक्षित मनुष्य त्याच्या उदनिर्वाहाचा मार्ग शोधीत असतो, त्याची पिळवणूक केली जाते आणि त्याला फसविले जाते. आजाऱ्याला तो त्याच्या खाटेवर पडलेला असताना कठोर शब्दानी त्याला दु:खाविण्यात येते, त्यामुळे त्याचा आजार अधिकच बळावतो.

अशा लोकांकरिता देव त्यांना सांत्वन/समाधान मिळण्याचा "मंडळीचे एकत्रीत येणे" हा एक मार्ग दाखविते. बायबलमध्ये संत पौलाच्याद्वारे देव आम्हांस आम्ही एकमेकांचे समाधान करावे असे शिकविते. (१ थेस्सल ४:१८) पौल आपणांस केवळ आज्ञाच करित नाही तर ती कशी पाळावी ते देखील स्पष्ट करितो. तो लिहितो, "यास्तव या वचनांनी एकमेकांचे समाधान करा." देव करो आणि या संदेशाद्वारे समाधान कसे करावे आणि समाधान कसे करुन घ्यावे या विषयी आमच्याशी बोलो.

१ थेस्सल ४:१६-१८ या वचनांमध्ये देव आपणांस तीन महत्वाच्या गोष्टी प्रकट करित आहे. इतर कोणत्याही शब्दांपेक्षा "या वचनांनी" या मध्ये खोल आणि उपयुक्त अर्थ भरलेला आहे.

## १. प्रभु स्वत: (येशू) स्वर्गातून उत्तरेल

पहिल्या शतकातील ख्रिस्तीजनांचा हरोदा सारख्या राजाने छळ केला. अनेक रक्तसाक्षी झाले. त्या दिवसांतील ख्रिस्तीजनांचा उत्कर्षामध्ये विश्वास नव्हता. पेत्र, योहान आणि पौल यांच्या सारख्या प्रेषितांनी उत्कर्षा विषयी/भरभराटी विषयी शिक्षण दिले नाही. त्यांच्याकडे केवळ स्वत:करिताच एक गुप्त शब्द होता आणि तो म्हणजे "मारानाया" ज्याचा अर्थ "येशू येत आहे" हे सुरुवातीच्या काळातील ख्रिस्तीजनांमध्ये असलेले हे शब्द आणि विश्वास त्यांना प्रभु येशूला भेटण्याकरिता पापरहीत असे पवित्रतेचे जीवन जगण्यास उत्तेजीत करीत होते. त्यांना या जगातील आकर्षक - मोहक अशा आशीर्वादापेक्षा स्वर्गीय गौरवी वारसा अधिक आकर्षक होता. कठीण परिस्थितीतून जात असताना देखील ते जाहिरपणे बोलू शकत होते, "कारण जगणे हे मला ख्रिस्त व मरणे हे मला लाभ असे आहे" (फिलिप्पै १:२१) त्रास, परिक्षा यांना सामोरे जात असताना ते धैर्यांना बोलत होते, "मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचा पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावतो, हेच एक माझे काम आहे." (फिलिप्पै ३:१३-१४).

एक रोग बरा होऊ शकतो, परंतु तो काही शेवट नाही. पर्जन्यानंतर एका मागून एक ढग येत असतात तव्दतच व्यक्तिच्या जीवनात आजार येत असतात. व्यक्ति जेव्हा तिच्यावर असणारे कर्ज चुकविते तेव्हा तिला सुटल्यासारखे वाटते. परंतु ही सुटका काही कायमस्वरुपी नसते. सुरवातीचे अभिषित्क विश्वासी जन ज्यांनी येशू ख्रिस्ताचे सामर्थ्य जाणले होते, ते एकमेकांचे समाधान/सांत्वन जगीक रितीने न करता, ज्या ज्या वेळी इतरांचे समाधान/सांत्वन "मारानाथा" या शब्दाने करीत असत.

आजकाल आपण दुसऱ्यांचे समाधान/सांत्वन कसे करीत आहोत? आपले समाधान/सांत्वन कसे करण्यात येत आहे? आजारातून मुक्त झाल्यामुळे आपले समाधान/सांत्वन होत आहे का? भरपूर पगाराच्या नोकरीमुळे समाधान/सांत्वन होत आहे का? या सर्व समाधान/सांत्वनाहून अधिक असे कायम स्वरुपी समाधान/सांत्वन आमच्याकडे आहे. येशू ख्रिस्ताये दुसरे येणे हे आपले कायम स्वरुपी समाधान/सांत्वन आहे. कायमस्वरुपी समाधान/सांत्वनाकरिता स्वत:ची तयारी करु या. देव करो आणि या वचनांनी इतरांचे समाधान/सांत्वन करण्यास कृपा पुरवो.

## २. आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले ते पहिल्याने उठतील. (१ थेस्सल ४:१६)

मृत्युचा अनुभव हा प्रत्येकाच्या जीवनात दु:खदायक असा असतो. ज्या लोकांनी त्यांचे प्रियजन गमावले त्यांचे समाधान कसे करावे अशा परिस्थितीत आपण सापडले असणार. ख्रिस्ती या ना त्याने आपण अशा दु:खीतांना, "देव करो आणि मृत व्यक्तिच्या द्वारे रिक्त झालेली जागा भरून काढो"असे म्हणतो. इतर लोक अशा व्यक्तिशी मानसिक रित्या किंवा ज्ञानाने/शहाणपणाने त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला तरी ते तात्पुरते असते. पूर्ण किंवा कायम स्वरुपी समाधान संत पौलाच्या शब्दांत मिळते. नितिसूत्रे १४:३२ या वचनात, "धार्मिकास मरणसमयीही उमेद असते." असे

वाचण्यात येते. नितीमान पुरुषाला त्याला मृत्युनंतर जे अनंतकालीक जीवन प्राप्त होणार आहे आणि ख्रिस्ताच्या दुसऱ्या येण्याच्या समयी त्याला मृतावस्थेतून जीवित उठण्याची प्रथम संधी मिळणार यावर दृढ विश्वास असतो. पुनरुत्थित प्रभुला प्रथम पाहाणारी मरीया आनंदाने भरून गेली. तद्वतच, प्रभुंच्या प्रभुला, राजांच्या राजाला दुसऱ्यांदा तो येईल. तेव्हा जे संतगण जिवंत असतील त्यांच्याही अगोदर मृत्यु पावलेले संतगण त्याला पाहातील ही आनंदीची गोष्ट आहे नाही का? हा आनंद लक्षात ठेवून पौल लिहीतो, "अरे मरणा, तुझा विजय कोठे? अरे मरणा, तुझी नांगी कोठे? (१ करिंथ १५:५५). या वचनांनी जे आजारी आहेत. त्यांचे आणि ज्यांनी त्यांचे प्रियजन गमावले आहेत त्यांचे समाधान करु या.

याच वेळेस, देव ज्या मंडळीत लोक एकमेकांचे समाधान करितात त्या मंडळीत आम्ही सहभागी व्हावे यासाठी आपल्याला बोलवित आहे. ज्यामुळे प्रभु येशू ख्रिस्ताच्य दुसऱ्या येण्याच्या वेळेस प्रथम जिवित होण्याचा अधिकाराचा आनंद घेता येईल.

## आपण तसेच सर्वदा प्रभुजवळ राहू.

"ख्रिस्ता बरोबर सर्वदा रहाणे हि सर्व आशांपेक्षा मोठी अशी आशा आहे. आणि प्रभु ही आशा जे त्याजवर भरोसा ठेवितात त्यांना देतो. पौल असे लिहितो, "ऐथून सुटून जाऊन ख्रिस्ताजवळ असण्याची मला उत्कंठा आहे." (फिलिप्पै १:२३).

जे एकाकी जीवन जगतात त्यांचे कधीही समाधान करण्यात येत नाही. मनुष्य एकाकी स्थिती आणि रिकामेपण सहन करण्यास चुकतो. अशा प्रसंगीमध्ये, ख्रिस्त पुन: येणार आहे अशासाठी की आपणाला त्याच्यासह सर्वकाळाकरिता राहाता याने हीच गोष्ट आपल्याला खरे समाधान देते. ख्रिस्ताबरोबर नेहमी रहाणे, कोण उपभोगणार हे देखील आपल्याला कळले पाहिजे. जरी अनंतकाळच्या जीवनाची आपल्याला खात्री असली, तरी देखील आपल्याला या जगात ख्रिस्तामध्ये जीवन जगण्याची गरज आहे. असे जीवन आपल्याला समाधान देईल आणि त्याच्या दुसऱ्या येण्याच्या नंतर त्याजसोबत सर्वदासाठी रहाण्या करिता तयार करील. "हनोख देवाच्या समागमे राहात असे (उत्पत्ती ५:२४)" देवासमीप जाणे यातच माझे कल्याण आहे. (स्तोत्र ७३:२८). जेव्हा ख्रिस्त मारियेच्या पोटात बाळ होता त्यावेळेस देव जो तिचा तारणारा त्यामध्ये तिचा आत्मा उल्हासला (लूक १:४७). ख्रिस्तीजनांनी भरभराटीचे जीवन जगण्याकरिता ख्रिस्ता बरोबर सहभागिता असणे आवश्यक आहे. सर्वात मोठे समाधान देव आमच्या सोबत आहे याचे ज्ञान असणे.

येशू प्रकटी ३:२० मध्ये बोलत आहे, "पाहा मी दाराजवळ उभा आहे व ठोकीत आहे. जर कोणी माझे ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ शांत जाईन व त्याच्या बरोबर जेवीन आणि तो मजबरोबर जेवील. जे या मुल्यवान निमंत्रणाचा स्विकार करतील. त्याचे समाधान होईल. ज्याप्रमाणे गीतरत्न २:४ या वचनात म्हटले आहे "त्याने मला आपल्या पानगृहात आणिले, त्याने मजवर प्रेमध्वज फडकविला." आपण त्याच्या प्रेमध्वजाखाली राहू या. तेव्हा खऱ्या अर्थाने आपले समाधान होईल. देवाची कृपा तुम्हांसह राहो.

❖❖❖


**Echo of His Call Advertisment Rates**

| Size | One Language Only | In All 16 Languages |
|---|---|---|
| Quarter Page | Rs. 2,000 | Rs. 30,000 |
| Half Page | Rs. 3,500 | Rs. 50,000 |
| Full Page | Rs. 5,000 | Rs. 70,000 |


## बातमी

### "बालविवाहा विरोधात लढाई"

मागील तीन दशकांमध्ये (२०१६ युनिसेफ) बालविवाहाचे प्रमाण ५०टक्के वरुन २७ टक्के पर्यंत जरी उतरले तरी देखील भारतात ते सर्वत्र सारख्याच प्रमाणात पसरले आहे. भारतात प्रत्येक दिवशी १५,६०० मुली (किंवा जवळ-जवळ ६ दशलक्ष प्रतिवर्षी, जागतिक, १५ दशलक्ष वधु प्रतिवर्षी याच्या तुलनेत) बालविवाहाच्या अंतर्गत येतात. मुलींना शाळा सोडण्यास भाग पाडले जाते व त्या त्यांच्या नवऱ्याच्या घरात गुलाम बनतात. जर त्या गर्भवती झाल्या तर त्यांचे शरिर बालकाला जन्म देण्यासाठी तयार झालेले नसल्यामुळे त्यांना मृत्युचा धोका असतो.

बालविवाहाच्या विरोधात गेली ४० वर्षे मोहीम चालवित आणि मुलींना समान हक्क मिळावा या करिता लढा देत असलेल्या व्यक्तिचे नाव ख्रिश्चन मेडीकल कॉलेज, वेलोरचे माजी विद्यार्थी डॉ. अशोक दयालचंद यांची लक्षावधी लेकरांनी २०१९चे लेकरांच्या हक्कांसाठी लढणारे हिरो आणि "जागतिक लेकरांचे बक्षिस", ज्याला "लेकरांचे नोबेल बक्षिस" ओळखले जाते, त्यासाठी निवड केली. त्यांनी आणि त्यांच्या IHMP या संस्थेने १९७५ पासून मुलींचा क्लब सुरु ज्यामुळे ५०० गांवातील एकूण ५०,००० मुलींना त्यांच्या हक्कांबद्दलचे आणि जीवनावश्यक कौश्यल्य - कसब शिकणे शक्य झाले. ज्ञान, आत्मविश्वास आणि एक दुसरीच्या आधारामुळे, मुली त्यांच्या पालकांना बालविवाहाकरिता जबरदस्ती न करण्याविषयी आणि शिक्षण पूर्ण करु देण्याविषयी समजाविण्यात यशस्वी झाल्या.

(संदर्भ : https://worldschildrensprize.org/ashokstory)

- (फोररनर ऑगस्ट २०१९)



# PIT TO PALACE
# खड्ड्यातून महालापर्यंतची मालिका

**(रेव्ह. सॅम सेल्वा राज यांच्या जीवनांतील अनुभव)**

**"वाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे" (मत्तय २४:१५)**

**"तुमचे कार्य आणि तुम्ही पवित्र जनांची केलेली व करीत असलेली सेवा, यावरून जी प्रिती तुम्ही त्याच्या नामावर दाखविली तीही देवाने विसरावी असा तो अन्यायी नाही"** (इब्री ६:१०).

१९८२ सालात, मला सेवेकरिता पुष्कळ प्रवास करावा लागत होता, आणि त्याच बरोबर स्थानिक सेवेमध्ये देखील लक्ष केंद्रीत करावे लागत होते. त्या दिवसात माझ्या उजव्या हातात भयंकर वेदना होत होत्या. परिणामी मला मासिकासाठी लेख लिहिता येत नव्हते आणि इतर काही जबाबदाऱ्या पार पाडता येत नव्हत्या. पेन धरता येत नव्हता आणि कोणतेही वाहन देखील चालविता येत नव्हते. उजवा हात जर टेबलावर ठेवावा असे वाटे तेव्हा डाव्या हाताच्या मदती शिवाय ठेवता येत नव्हता. माझ्या सर्व कामाकरिता मला इतरांवर अवलंबून राहावे लागत होते. अशा प्रकारे मी भयंकर अशा वेदना सहन केल्या.

मी केवळ प्रार्थनाच केली असे नाही, तर काही व्यायाम देखील केला. अशी स्थिती जवळ जवळ वर्षभर होती. वेदना जशी वाढत असे, मला वाटत असे की, यातून मला आराम मिळणार नाही.

## देवाने मार्ग सुलभ केला

एके दिवशी देवाचे एक वयस्कर सेवक पत्नीसहीत मला भेटण्याकरिता आले. त्यांनी मला त्यांच्या सेवेमध्ये सहकार्य करण्याची विनंती केली. मी त्यांचा उपयोग आमच्या मंडळ्यांमधील आणि सेवेतील विशेष सभांमध्ये करुन घेऊ लागलो. मला त्यांचे इंग्रजीतील संदेश तामीळ भाषेत करावे लागत होते, शिवाय त्यांना निरनिराळ्या ठिकाणी घेऊन जावे लागत होते. देवाने त्यांचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग करुन घेतला. पुष्कळशा लोकांनी त्यांचा येशू ख्रिस्ताचा तारणारा म्हणून स्विकार केला. मी देखील किती तरी लोकांना जुन्या पाठ दुखण्यातून, घशाच्या त्रासांतून सुटका मिळालेली पाहात होतो. काही जणांची तर दुष्ट आत्म्याच्या बंधनातून देखील सुटका झाली होती. तरी देखील मी माझ्या हाताच्या दुखण्या बद्दल सांगितले नाही.

ते जोडपे अतिशय वयस्कर असल्यामुळे, मला त्यांच्या दोन बॅगा आणि माझी देखील बॅग उचलून घ्यावी लागत होती. माझ्या हाताचे दुखणे असताना देखील, मी आनंदाने त्यांच्या बॅगा उचलीत होतो. त्यांनी अनेक वेळा विचारले, "बंधु तुम्हाला हे सर्व उचलणे जमते ना ? तुम्ही ठीक आहात ना ? एकदा केरळ राज्यातील मुनार या ठीकाणी असताना, मी आमचे सर्व सामान बसमध्ये चढविण्याच्या प्रयत्नात असताना दुर्दैवाने आमच्या बॅगा आणि इतर प्रवाशांच्या बॅगा माझ्या बाजूला आडव्या झाल्या आणि मी खाली पडलो. सर्व प्रवासी कसे जोरात ओरडले आणि माझ्या मदतीला धावून आले. आज देखील ती घटना मी विसरलेले नाही. माझ्या उजव्या हाताचे दुखणे दिवसें-दिवस वाढतच होते आणि माझे भाषांतराचे आणि सामान उचलण्याचे काम सुरुच होते.

शेवटी त्या जोडप्याने त्यांची भारतातील सेवा संपविली व चेन्नाई मधून विमानाने ते त्यांच्या देशाला निघून गेले. मी विमानतळावर त्यांना निरोप देण्याकरिता गेलो त्यावेळेस हातामध्ये असह्य. वेदना होत होत्या. तशाच स्थितीत म घरी परतलो आणि वर्षभर होत असलेल्या वेदना पूर्णपणे बंद झाल्या होत्या आणि त्या वेळेपासून मी माझा हात अगदी सहजपणे हालवू शकलो व सर्व कार्य सुरु करू शकलो.

आता ते दुखणे नाहीसे होऊन ३० वर्षे झालीत. परंतु ते दुखणे परत उभ्दवले नाही. आश्चर्यकारक रितीने मला आरोग्यदान प्राप्त झाले. सत्य हे आहे की, मी जोडप्याची माझ्या हाताच्या दुखण्याकडे लक्ष न देता सेवा केली, त्यामुळे त्या जोडप्यात आरोग्यदानाचे जे सामर्थ्य होते ते मजवर पडले आणि मला आरोग्यदान प्राप्त झाले. त्यानंतर आजपर्यंत त्या जोडण्याची आणि माझी भेट झाली नाही. मी त्यांच्याशी संपर्क देखील साधू शकलो नाही. मला केवळ त्यांची नावे माहित होती - मिस्टर हेडगस आणि सॅली हेडगस.

आज देवाने मला अनेक सहकारी पाळक आणि सेवक देऊन आशीर्वादीत केले आहे आणि ते सर्वजण लहान लेकराप्रमाणे माझी काळजी घेत आहेत. देव उत्तम प्रकारे माझे रक्षण करीत आहे.

मला मदत करण्याकरिता देवाचे अनेक लोक तयार आहेत. मी जगभरात जेथे कोठे जातो तेथे मला आधार देण्यासाठी देवाने पुष्कळसे चांगले देवभक्त लोक पुरविले आहेत.

प्रिय वाचका, तुझ्या सेवेमधील तुझा मार्ग खुप कठीण आहे का? देव तुला भुकेलेल्या स्थितीत, आजारात आणि कर्जात का ठेवित आहे या विचाराने मन दुखीत झाले आहे का? देवाचे दुसरे सेवक ऐषारामी जीवन जगत असताना तूच एकटा आजपर्यंत कठीण असे जीवन का जगत आहे अशा विचार करीत आहेस का ? कंटाळून जाऊ नकोस. देवा करिता जे काही छोटे काम करीत आहेस आणि ज्या मोठ्या त्रासांतून जात आहेस, ते सर्व लक्षात रहाण्यासाठी त्याच्या नोंदवहीत लिहीलेले आहे. योग्य वेळी देव त्यांना जिवित करील आणि आशीर्वादात बदलील. **"जे परमेश्वराची आशा धरून राहतात त्यांस, तो जीव त्याला शरण जातो त्यास, परमेश्वर प्रसन्न होतो."** (विलापगीत ३:२५). ❖❖❖

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/18-20

# ECHO OF HIS CALL

Monthly magazines in 16 languages, Bible Colleges, Postal Courses, Church Planting, Village English High School, Gospel Printing Press, Crusades, Seminars, Social Services, etc.

**Annual Subscription : Rs. 100/-**
**Life Subscription : Rs. 2000/-**

The Multifarious activities of **Echo of His Call Ministry** is supported by the free-will offeerings and donations of the God's children like you. You may support Echo of His Call and its activities as the Lord leads you. We need your help to send forth the Gospel to the unreached people and plant Churches.

If you would like to receive **ECHO OF HIS CALL** magazines regularly, please write to us. Whenever you change your postal or e-mail addresses, please do inform us your old and new address.

**Echo Of His Call** is available in 16 langues in our websites also. You can read it by going into the site as well as downloading it and get bleassed.

Your letters, prayer requests and your financial helgs (by D.D., Cheque, M.O. etc) to **ECHO OF HIS CALL** may be seat to the address below

Please send your **Land Phone / Cell Phone Numbers and E.mail addresses far updation.**

## ECHO OF HIS CALL

10, MOHAMMED ABDULLAH STREET, CHEPAUK
CHENNAI-600 005, INDIA
PH:(+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell:(+91) 98410 71852, 95661 31858
E-mails: sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org/
www.echoofhiscall.com
YOU CAN SEND YOUR DONATIONS ON ONLINE ALSO

## आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या करीता कृपया प्रार्थना करा :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **बायबलकोर** - पत्रव्यवहाराद्वारे बायबल अभ्यासक्रम : इंग्रजी, तामीळ, हिन्दी
३. **एको ऑफ हिज कॉल** - मासिक :
इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नडा, मराठी, गुजराती, बंगाली, उडीया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
४. नहेम्या बायबल कॉलेज : (दोन केंद्रे)
५. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
६. महान सेवा भागीदार (नेटवर्क ऑफ पास्टरस)
७. प्रशिक्षण कार्यक्रम
८. धर्मसभा
९. हस्तपत्रिका वितरण आणि मागोवा (पाठपुरावा)
१०. शुभवर्तमान साहित्य छापण्याचा मुद्रणालय
११. सेंट पॉलस् मॅट्रिक्युलेशन स्कूल : गावातील इंग्रजी शाळा
१२. शब्बाथ शाळा : सकाळी ८.३०वा. आणि सायं. ४ वा.
१३. **तामिळ उपासना** : ५.३० वा. पहाटे, ७ वा. सकाळी आणि १० वा. सकाळी
१४. मल्यालम उपासना : रविवारी दुपारी ३ वा.
१५. तेलगू उपासना : रविवारी दुपारी ४ वा.
१६. हिन्दी उपासना : रविवारी सायंकाळी ५ वा.
१७. इंग्रजी/तामिळ उपासना : रविवारी सायंकाळी ६ वा.
१८. पाळकांचे समोपदेशन : रविवारी दुपारी ४ वा.
१९. स्त्रियांची प्रार्थना : बुधवारी सायंकाळी ५.३० वा.
२०. प. शास्त्राभ्यास : बुधवारी सायंकाळी ६.३० वा.
२१. पुरुषांची प्रार्थना : शुक्रवारी सायंकाळी ७ वा.
२२. कर्मचाऱ्यांची सभा : शनिवारी सायंकाळी ६ वा.
२३. गृह प्रार्थना सभा : सोमवार/मंगळवार सायंकाळी ६.३०वा.
२४. विशेष पवित्र सहभागीता : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी पहाटे ५.३० वा.
२५. सेवकार्याचे सिंहावलोकन : पहिला शनिवार सायंकाळी ६.३०वा.
२६. पालकांची प्रार्थना : पहिला रविवार दुपारी ४ वा.
२७. रात्रीची प्रार्थना : दुसरा शुक्रवार रात्रौ ९.३० वा.
२८. उपवास प्रार्थना : पहिला शनिवार सकाळी ९.३० वा.
२९. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनांमध्ये
३०. सकाळचे मनन : दररोज पहाटे ५.३० वा.
३१. कर्मचारी मनन : दररोज सकाळी ९ वा.
३२. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ वा.(रविवार सोडून)

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. TN/CH/(C)/206/18-20**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/18-20**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th FEBRUARY 2020**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from No.18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers** No. 18, Mohammed Abdullah Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**